# मास्तरकीचे दिवस

न्या. नरेन्द्र चपळगावकर

माझा बी.ए.चा निकाल मला अनपेक्षित होता; पण त्यात चुकीचे काही नव्हते. परीक्षेच्या अगोदर दहा- पंधरा दिवस अभ्यास करावयाचा आणि पास होऊन जायचे ही पद्धत मला मॅट्रिक आणि इंटरला उपयोगाला पडली होती. खरे म्हणजे मॅट्रिकच्या निकालाने धोक्याची सूचना दिली होती. आठ दिवसांच्या अभ्यासात पास झालो तरी मराठवाड्यातील महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी आवश्यक गुण मला मिळाले नव्हते आणि त्यामुळे इंटरसाठी नागपूर विद्यापीठाचा आश्रय घ्यावा लागला होता. तरीही फक्त 'ताजा ताजा' अभ्यास करण्याचे मी सोडले नव्हते. इंटरला निभावले, पण बी.ए.ला मात्र या पद्धतीने दगा दिला. इतर सर्व विषयांत मी उत्तीर्ण झालो होतो; पण इंग्रजीत चार गुण कमी पडले होते. पुरवणी परीक्षेला बसावे लागणार होते. त्यासाठी औरंगाबादमध्येच राहण्याची गरज नव्हती. गावी राहूनही अभ्यास करता येणार होता. त्यातच सोयीची गोष्ट अशी झाली होती की माझ्या बरोबर अभ्यास करणारा भगवानदास वर्माही इंग्रजीतच अनुत्तीर्ण झाला होता. जात्यास हुशार असलेला एका गरीब मारवाडी सोनार कुटुंबातला भगवानदास अत्यंत कष्टाने आपले आणि आपल्या भावांचे शिक्षण करीत होता. एका खेड्यातल्या शाळेत नोकरी करता करता तो बहिस्थ विद्यार्थी म्हणून पुढचे शिक्षण घेत होता. बी.ए.चा अभ्यास मी, भगवानदास आणि सुशीला बडवे या तिघांनी बरोबरच केला होता. सुशीला ही प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत नोकरी करत करत शिकणारी एक जिद्दी मुलगी होती. ती मात्र पास झाली होती. तरी मला आणि भगवानदासला इंग्रजीचा अभ्यास बरोबर करण्याची संधी होती.

पुरवणी परीक्षेत इंग्रजीत उत्तीर्ण झालो तरी पुढचे शिक्षण सुरू होण्यासाठी जूनपर्यंत थांबावेच लागणार होते. बीडला वर्षभर रिकामे राहून काय करायचे म्हणून तेवढे वर्ष शिक्षक म्हणून काम करण्याचा अनुभव घ्यावा असा विचार मी केला. नोकरी ही त्या काळात आजच्यासारखी कठीण गोष्ट नव्हती. ज्या शाळेत मी शिकलो होतो त्याच बीडच्या चंपावती विद्यालयात शिक्षक होण्यासाठी मी अर्ज केला. मुख्याध्यापकांनी अर्ज ठेवून घेतला आणि तीन-चार दिवसांनी येण्यास सांगितले. मुख्याध्यापक बाबूसिंग हे माझेच काय पण माझ्या वडिलांचेही शिक्षक होते. सरकारी हायस्कुलातील मुख्याध्यापकपदावरून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी चंपावती विद्यालयाचे मुख्याध्यापकपद स्वीकारले होते. चंपावती शाळेच्या नियामक मंडळात मला लहानपणापासून ओळखणारी आणि माझ्या गुणदोषांची कल्पना असलेली मंडळी होती. त्यांच्या संमतीनंतर बाबूसिंगांचा पाच- सात दिवसांतच निरोप आला की शाळेत रुजू हो.

त्या काळी शिक्षक होताना शिकवण्याच्या प्रशिक्षणाची पदवी किंवा पदविका असणे आजच्यासारखे फार आवश्यक नव्हते. अप्रशिक्षित शिक्षकांच्याही नेमणुका होत व नंतर त्यांना क्रमवारीने शिक्षण महाविद्यालयात जागा मिळेल तस तसे ट्रेनिंगसाठी पाठवण्यात येई. अप्रशिक्षित व प्रशिक्षित शिक्षकांच्या पगारात मात्र फरक असे. चंपावती शाळेत बी.एड. आणि डी.एड. झालेल्या शिक्षकांची संख्या दोन-चारच असेल. मी तर बी.ए.ही झालो नव्हतो.

त्यामुळे मला मॅट्रिकची वेतनश्रेणीच मिळणार होती. ५४ ते ९८½ या वेतनश्रेणीमध्ये भत्त्यासह मला १३२ रुपये दहा आणे आठ पै पगार मिळणार होता. अर्थात पगाराचा फारसा प्रश्न नव्हता.

याच शाळेत मी शिकत होतो त्यावेळी शाळेत फक्त चौथीपर्यंतचे वर्ग होते. धोंडापुरातील कबाडगल्लीत असलेल्या नामलगावकरांच्या वाड्यात आणि शेजारच्या हिरामणसिंग बुंदेल्यांच्या जागेत ते वर्ग भरत. निजामाच्या राज्यात उर्दूच्या असलेल्या प्राबल्यामुळे व सक्तीमुळे खाजगी शाळा काढणे हा स्वातंत्र्यचळवळीचा एक भागच झाला होता. त्यानुसार १९४२ साली ही शाळा स्थापन झाली होती. पुढे स्वातंत्र्यांतर हळूहळू मॅट्रिकपर्यंतचे वर्ग उघडले होते. त्यासाठी नवी जागा पाहावी लागली होती.

बीड शहरातल्या जुन्या बाजारातील नदीकाठच्या वेशीजवळची नगरपालिकेच्या मालकीची एक जुनी इमारत शाळेने डागडुजी करून घेतली होती. निजामी राजवटीच्या काळात कधी तरी ७०-८० वर्षांपूर्वी बांधलेली ही इमारत आशरुखाना म्हणजे उतारकरूंना थांबण्यासाठी असलेली धर्मशाळा होती. शासकीय पैशातून निजामाने बांधलेली ही इमारत सर्वधर्मियांच्या उपयोगांसाठी होती. पुढे स्वातंत्र्यानंतर मुस्लिम वक्फ बोर्डाने या इमारतीच्या मालकीवर हक्क सांगून ती आम्हाला द्या असा एक दिवाणी दावा दाखल केला. नगरपालिकेने प्रतिवादी म्हणून अशा दाव्यात बाजू मांडणे आवश्यक होते. परंतु नगरपालिकेला स्वत:च्या मालमत्तेपेक्षा मतांची काळजी जास्त वाटण्याचा संभव दिसू लागला तेव्हा या दाव्यात हजर होऊन माझ्या वडिलांनी ही इमारत शासनाच्या पैशातून बांधली गेल्यामुळे ती सर्वधर्मियांच्यासाठी आहे अशी बाजू नागरिकांच्या वतीने न्यायालात मांडली.

जुन्या काळातल्या धर्मशाळेची इमारत. बहुतेक सर्व इमारत एकमजली. दर्शनी भागावर दुसरा मजला, त्यात तीन खोल्या बांधलेल्या. त्यातल्या एकीत मुख्याध्यापक बसत. चुन्यात बांधलेल्या या इमारतीची सतत दुरुस्ती करावी लागे. धाब्याच्या इमारतीचे छत पावसाळ्यात गळे. काही वेळा छताच्या गिलाव्याचे धलपे खाली पडत. पाचवी ते दहावी या सहा वर्गांना आणि कार्यालय, शिक्षकांची खोली, ग्रंथालय या सगळ्यांना ही जागा अपुरी पडे आणि त्यामुळे मधल्या चौकातसुद्धा कधी कधी वर्ग घ्यावा लागे.

शालेय अभ्यासक्रमाचा फार अभ्यास न करणारा पण अवांतर उपक्रमात पुढे असणारा एक विद्यार्थी म्हणून बाबूसिंगांना माझी ओळख होती. त्यांचा माझ्यावर विशेष लोभही होता. त्यांनी मला सरळ मॅट्रिकच्या म्हणजे दहावीच्या वर्गाचा वर्गशिक्षक म्हणूनच काम सुरू करण्यास सांगितले. शिवाय मी मॅट्रिकच्या वर्गाला मराठी व नववीला इतिहास-भूगोल शिकवायचा होता. पहिल्या दिवशी मी विद्यार्थ्यांची हजेरी घेण्यासाठी हजेरी पुस्तक घेतले. विद्यार्थ्यांच्या नावापुढे त्याची जन्मतारीखही लिहिलेली असे. वर्गातील विद्यार्थ्यांपैकी चार-पाच विद्यार्थी माझ्या अगोदर जन्मलेले होते. शिवाय वर्गात ओळखीचे बरेच चेहरे होते. गाव लहान असल्यामुळे ते स्वाभाविकच होते. वर्गात सात- आठ मुली होत्या. त्यातल्या दोन-तीन विवाहित होत्या. एक तर आमच्या मुख्याध्यापकांची पत्नीच होती. पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर बराचकाळ विधुर राहिलेल्या बाबूसिंग गुरुजींनी सेवानिवृत्तीनंतर हे लग्न केले होते.

पूर्वानुभव नसला तरी वर्गात शिकवायला सुरुवात करताना मला भीतीबिती अजिबात वाटली नाही. भाषणे करण्याच्या आणि सार्वजनिक समारंभात भाग घेण्याच्या नादामुळे धीटपणा अंगात होताच; शिवाय बाबूसिंगांनी मॅट्रिकचे मराठी मला शिकवायला दिले होते.

मराठी भाषा आणि वाङ्मय यांची पूर्वीपासून आवड असल्यामुळे आणि तेव्हाच्या क्रमिक पुस्तकात केवळ वाङ्मयीन गुणवत्तेवर बहुतांश: धड्यांची निवड झालेली असल्यामुळे शिकविणे मला आवडू लागले. दहावीच्या मराठीशिवाय नववीचेही मराठी आणि इतिहास-भूगोल हे विषय मला घ्यावे लागत. शाळेत हायस्कूलचे वर्ग उघडावयाचे ठरल्यावर चांगले शिक्षक यावेत म्हणून अंबाजोगाईच्या योगेश्वरी विद्यालयातील एकनाथराव कुलकर्णी गुरुजींची मदत घेण्यात आली होती. त्यांच्यामुळे सोलापूर भागातील काही चांगले शिक्षक शाळेत आले होते. इतर काही तर बीड गावातलेच होते. थोड्याच दिवसांत त्या सर्वांचाच स्नेह झाला.

वरच्या वर्गांना मराठी शिकवण्याची संधी मिळण्याचा आणि मॅट्रिकच्या वर्गाचा वर्गशिक्षक असण्याचा माझा आनंद फारच थोडे दिवस टिकला. मी केवळ १९ वर्षांचा होतो आणि व्यवहाराचा फारसा अनुभव नव्हता. त्यामुळे परिणामाचा विचार न करता एखादी गोष्ट घडून जाई. एकदा वर्गात मी शिकवत असताना शेवटच्या बाकावर बसणाऱ्या चार-पाच मुली माझ्या शिकवण्याकडे अजिबात लक्ष न देता आपसात गप्पा मारत वह्यावर काही लिहीत एकमेकींना वह्याची देवघेव करीत होत्या. मी जवळ जाऊन पाहिले तर त्यात चिमण्यांची चित्रेसुद्धा काढणे चालू होते. शिक्षकाला आवश्यक असलेली क्षमाबुद्धी अद्याप माझ्यात यावयाची होती. मी रागाने त्या सगळ्याच मुलींना वर्गाच्या बाहेर जाण्याला सांगितले. या मुलीपैकी एक होत्या मुख्याध्यापकांच्या सौभाग्यवती.

दुसऱ्याच दिवशी सकाळी मला मुख्याध्यापकांनी बोलावून घेतले. अतिशय गोड शब्दांत मला सांगितले की, माध्यमिक विभागात इंग्रजी शिक्षणाची फार आबाळ होत आहे. सध्या शिकवणारे शिक्षक चांगले नाहीत. सहावी- सातवीचे वर्ग असे असतात की त्यात भाषा विषयाचा पाया घातला जातो. तू उद्यापासून हे काम कर. त्याचा विद्यार्थ्यांना उपयोग होईल. दुसऱ्या दिवशीपासून मला माध्यमिक विभागात बदलण्यात आले व तेथे सहावी- सातवीच्या वर्गांना मी शिकवू लागलो. मुख्याध्यापकांनी गोड शब्दांत माझ्या बदलीचे योग्य वाटणारे कारण सांगितले असले तरी दहावीच्या वर्गावरून माध्यमिक शाळेत मला पाठवण्यामागचे खरे कारण सहज लक्षात येत होते. मुख्याध्यापकाची पत्नी वर्गात विद्यार्थिनी असली तरी तिचा दर्जा लक्षात घेऊन इतर सामान्य विद्यार्थ्यांपेक्षा वेगळी वागणूक द्यावयास हवी हे माझ्या लक्षातच आले नाही. शिवाय आज असे वाटते की वयाने माझ्यापेक्षाही पाच- दहा वर्षांनी वडील असलेल्या विद्यार्थ्यांना, त्यातही विद्यार्थिनींना वर्गाबाहेर जाण्यास सांगणे ही जरा कठोर आणि अनुचित शिक्षा होती. त्यांना समजावून सांगणे आणि त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे हेच योग्य झाले असते.

माध्यमिक शाळेचे वर्ग दुपारी भरत. जुना बाजार ही एक मिश्रवस्ती होती. बलभीम चौकापासून बिंदुसुरा नदीपर्यंत जाणाऱ्या मोठ्या रस्त्याच्या आजूबाजूला बहुतेक मुस्लिम वस्ती होती. तर आतल्या बाजूला असलेल्या गल्ल्यात एका बाजूला ब्राह्मण वस्ती तर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला हत्तीखाना वगैरे भागात शेती आणि इतर व्यवसाय करणारे विविध जमातीचे लोक राहत. मुस्लिम वस्तीत फारसा व्यापार नव्हता. घराची दर्शनी दारे सामान्यत: बंदच असत. या भागात संध्याकाळी फारशी चहेलपहेल नसे. शाळा सुटल्यावर घरी जायला निघाले तर कित्येकवेळा रस्त्यात कोणी दिसतच नसे. बलभीम चौकात आले म्हणजे तेथून मग रस्त्यावर बरीच माणसे दिसू लागत. बीडमध्ये तेव्हा वीज आलेली नव्हती. त्यामुळे दुकानातील प्रकाशाचा झगझगाट दिसत नसेच. खरे म्हणजे शाळा आणि आमचा वाडा

यातले अंतर फार तर तीन फर्लांगांचे असेल; पण जुना बाजारातल्या उदास वातावरणातून चालत येणे नको वाटे. गावात नुकत्याच सायकल रिक्षा सुरू झाल्या होत्या. काही वेळा रिक्षात बसून मी घरी येई.

माध्यमिक विभागाचे प्रमुख होते बापूसाहेब कोष्टगावकर. ते सातवीचे वर्गशिक्षक होते. मला सहावीचा वर्गशिक्षक करण्यात आले. सहावी-सातवीचे मराठी आणि सहावीचे इंग्रजी आणि इतिहास-भूगोल असे काही विषय मला देण्यात आले होते. सहावीला जे इंग्रजीचे क्रमिक पुस्तक होते ते शाळेने मला दिले. तेच पुस्तक माझ्यापूर्वीच्या इंग्रजी शिक्षकांनी वापरलेले होते. पुस्तक फारच सुलभ करून टाकण्यात आले होते. धड्याच्या नावापासून ते धड्याखालील कठीण शब्दांच्या अर्थापर्यंत रोमन लिपीतील प्रत्येक शब्दाचा उच्चार देवनागरीत खाली लिहिलेला होता. असे द्वैलिपीक पुस्तक माझ्या हातात आले होते. शिवाय धड्यातील बहुतेक नव्या शब्दांचे मराठी अर्थही तत्परतेने समोर लिहून घेण्यात आले होते. या सुलभतेचे कारण पुढे कळाले. जे शिक्षक सहावीला इंग्रजी शिकवीत त्यांचे शिक्षणच मुळी सातवीपर्यंत तेही उर्दू माध्यमातून पूर्वी झाले होते. शिवाय इंग्रजी विषयाच्या परीक्षकांनी त्यांच्याकडे फारच उदारपणे पाहिले असावे तरीही बिचाऱ्यांना इंग्रजी शिकवावे लागत होते.

शाळेत मुलांना बसण्यासाठी पाठी नसलेले साधे बाक असत. शिक्षकांच्या खोलीतही फारसे चांगले फर्निचर नव्हते. शाळेत पूर्वी ग्रंथालय नावाचा प्रकारच नव्हता. बाबूसिंगांच्या पूर्वी वा.ह. घारपुरे नावाचे एक वाङ्मयप्रेमी गृहस्थ काही दिवस मुख्याध्यापक राहून गेले होते. त्यांनी काही लेखन केले आहे. त्यांच्या काळात तीनचारशे पुस्तके जमा करून त्यांनी ग्रंथालय सुरू केले होते. व्हरांड्याला पाऊण उंचीची भिंत बांधून तयार केलेली एक खोली आम्हा शिक्षकांची 'कॉमन रूम' होती. त्या खोलीच्या आत असलेल्या एका अंधाऱ्या खोलीत एका चार फुटी उंचीच्या कपाटात आमचे ग्रंथालय बंद असे.

शाळेला गावातील सुशिक्षित मध्यमवर्गीयांची सहानुभूती असल्यामुळे त्यांचे पाल्य तर शाळेत असतच शिवाय आजूबाजूला राहणारे अनेक गरीब विद्यार्थीही शाळेत होते. या मुलांचे आपल्या शिक्षकांवर प्रेमही असे. एकदा माझ्या चपलेचा अंगठा वर्गातच तुटला. वर्गात असलेल्या मुलापैकी एक तास संपल्यानंतर जवळ आला आणि त्याने 'चप्पल द्या मी अंगठा शिऊन आणतो' असे मला सांगितले. एका हिंदी भाषिक चांभाराचा हा मुलगा. फार गरीब परंतु हुशार होता. मी त्याला चप्पल देण्याला प्रथम संकोच करीत होतो, पण त्याने आग्रह धरून मधल्या सुटीत चप्पल नेली आणि जवळच असलेल्या घरी जाऊन अंगठा शिऊन आणला.

शाळेतल्या प्रशिक्षित शिक्षकांपैकी एक होते. मुकुंदराव कुलकर्णी. ते मराठी भाषा आणि वाङमयावर आणि त्याचबरोबर विद्यार्थ्यांवर प्रेम करणारे एक शिक्षक होते. इतक्या मृद स्वभावाचा माणूस मी पाहिला नाही. त्यांच्या पत्नी पाच-सात वर्षे आजारी होत्या. त्या काळात पत्नीची शुश्रुषा, घरचे सगळे काम करून मुकुंदराव शाळेतले काम कोणतीही सूट न मागता करीत. अनेक विद्यार्थी तर त्यांना आपले पालकच मानत. आपल्या अडचणी त्यांनाच सांगत. सोलापूरला बुद्धिसागर कुटुंबीयांचा सहवास लाभलेले श्रीधरराव कामतकर हे अत्यंत उत्तम हस्ताक्षराचे व शिस्तीचे शिक्षक. विज्ञान आणि गणित शिकवणारे रा.कृ. बेडेकर आपले काम निष्ठेने करणारे पण अवांतर गप्पात फारसे न रमणारे. माध्यमिक शाळेत एक सहकारी होते न.दि. बल्लाळ. जाड भिगांचा चष्मा घालणारे बल्लाळ इतिहास आणि इतर विषय शिकवत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सैनिक असलेल्या बल्लाळांच्या अंगकाठीवर संघस्थानावर व्यायाम केल्याच्या कोणत्याच खुणा दिसत नव्हत्या. त्यांच्या मोकळ्या स्वभावामुळे आणि तेही माध्यमिक विभागातच माझ्याबरोबर काम करीत असल्यामुळे माझा त्यांचा विशेष स्नेह झाला.

शाळेत चहा येई. तो लगतच्या वेशीखालच्या देवळीत संसार मांडलेल्या एका मुस्लिम जोडप्याकडून. निदान वर्षभर तरी अंगाला पाण्याचा स्पर्श न झालेले हे कळकट जोडपे म्हणजे नमुना होते. पुरुषाने जटा वाढवलेल्या, लांब कुडता आणि खाली लुंगी. बाईचा विशेष म्हणजे तिचे नाक कोणत्या तरी गुन्ह्यासाठी कापलेले होते. दोघांच्याही अंगाप्रमाणेच कपड्यांनाही पाण्याचा फारसा स्पर्श होऊ दिलेला नव्हता. शाळेच्या मोहन चपराश्याने निरोप दिला म्हणजे दोघांपैकी कोणी तरी चहा घेऊन येई. ॲल्युमिनियमची किटली बाहेरून काळ्या कीटणाने मढलेली असे. कप टवके गेलेले आणि त्यातही मळाची पुटे चढलेले असत. त्यात चहा घेणे मला प्रथम कठीण गेले, पण नंतर काही वाटेनासे झाले.

शाळेत शिकवताना काही नवे उपक्रम सुरू करण्याचा मी प्रयत्न केला. दर शनिवारी शाळा चार तासानंतर सुटे. त्यातील चौथा तास सातवीच्या आणि सहावीच्या वर्गांना आलटूनपालटून मी कवितेचा तास म्हणून घेई. या तासात एखाद्या कवितेचा, मग अभ्यासक्रमात ती कविता असो अगर नसो, अर्थ सांगून मुलांना पुढच्या आठवड्यात ती पाठ करून येण्यास मी सांगत असे. अनेक मुलांनी या तासाचा उपयोग करून बऱ्याच कविता पाठ केल्या. त्यांचे पाठांतर पाहावे म्हणून मी काही वेळा त्या कविता म्हणून दाखवा असे मुलांना सांगे. कुणी कविता सरळ गद्याप्रमाणे म्हणून दाखवत तर कोणी ती चालीवर म्हणत. चालीवर कविता म्हणावयास सांगण्याचा मला पश्चाताप होईल असा अनुभव एका विद्यार्थ्याने मला दिला. कवी यशवंतांची ‘आई’ ही कविता मी पाठ करावयास सांगितली होती. दुसऱ्या आठवड्यात एका मुलाने ती म्हणून दाखवू का असे विचारले. मी होकार देताच त्याने लावलेल्या चालीवर ‘आई’ म्हणण्यास सुरुवात केली. त्या काळात भाई-भाई चित्रपटातील ‘ए दिल मुझे बता दे, तू किसपे आ गया है । वो कोन है जो मुझपे आँखोसे छा गया है’ हे गीता दत्तांनी गायिलेले उडत्या चालीचे गाणे फार लोकप्रिय होते. याच गाण्याची चाल त्याने ‘आई’ कवितेला लावली होती. बिचारे यशवंत सुदैवाने आमच्या शाळेत तेव्हा हजर नव्हते. अन्यथा त्यांना ही कविता लिहिण्याचा पश्चाताप झाला असता.

मराठवाडा साहित्य परिषदेचे मुख्य कार्यालय राज्यपुनर्रचनेपूर्वी हैदराबादला होते; मात्र परिषदेच्या शाखा आणि काम मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी चालू होते. मिलिंद महाविद्यालयात शिकत असताना माझा परिषदेशी संबंध आलाच होता. बीडला आता पुन्हा आल्यावर मी परिषदेची एक शाखा स्थापन केली. शाखेचे अध्यक्ष मधुसुदनराव वैद्य वकील तर मी चिटणीस होतो. शाखेच्या बैठका कधी कुणाच्या घरी तर कधी शाळेत होत. वाङ्मयाचा फारसा अभ्यास नसला तरी माझा उत्साह मात्र दांडगा होता. बा.सी. मर्ढेकरांच्या निधनानंतर त्यांना श्रद्धांजली वाहण्याचा एक कार्यक्रम आम्ही परिषदेतर्फे घेतला. मर्ढेकरांच्या चार-दोन कवितांची ओळख असली तरी त्यांचे इतर वाङ्मय फारसे वाचलेलेच नव्हते. अशाही परिस्थितीत त्यांच्याबद्दल ‘चार शब्द’ सांगण्याची जबाबदारी माझ्यावरच आली.

१९५६ साली राज्यपुनर्रचना झाली होती. मराठवाडा विद्यापीठाची मागणी नवे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी तत्त्वत: मान्य केली होती व विद्यापीठ कसे असावे

याबदल शिफारशी करण्यासाठी आयोग नेमला होता. हैदराबाद उच्च न्यायालयाचे भूतपूर्व मुख्य न्यायाधीश आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्या. श्रीपतराव पळणीटकर यांच्या अध्यक्षतेखालच्या या आयोगाने १९५७ च्या सप्टेंबर महिन्यात बीडला भेट दिली. आयोगाने केलेल्या जाहीर आवाहनानुसार गावातील काही प्रतिष्ठित नागरिक त्यांना भेटले आणि आयोगाच्या प्रश्नांच्या उत्तरात त्यांनी विद्यापीठाबद्दलच्या आपल्या अपेक्षा सांगितल्या. मी गावातला प्रतिष्ठित नागरिक नव्हतो; पण उत्साही मात्र होतो. शिवाय आयोगाचे एक सदस्य म.भि चिटणीस यांचा मी विद्यार्थी होतो. एक लेखी निवेदन शक्यतो सुवाच्य हस्ताक्षरात लिहून मी ते आयोगाला दिले. आयोगाच्या सदस्यांपैकी वि.भि. कोलते आणि शामराव कदम यांनी मला तुझ्या गावातले महानुभव मंदिर कुठे आहे असे विचारले. हे मंदिर पाहण्याची त्यांची इच्छा होती. मलाही ते ठाऊक नव्हते. शेवटी चौकशी करता ते आमच्या शाळेच्या समोरच्याच गल्लीत असल्याचे कळाले. बीडमध्ये मोटारी तर उपलब्ध नव्हत्याच. शेवटी एका सायकलरिक्षात शामराव आणि कोलते तर दुसऱ्यात मी आणि डोंगरकेरी (पुढे आमचे कुलगुरू झालेले) असे त्या मंदिरात गेलो. चक्रधरांचे ज्या ज्या ठिकाणी पाऊल पडले त्या त्या ठिकाणी बांधलेले ओटे आणि मंदिराच्या गाभाऱ्यात ठेवलेल्या सातीग्रंथांपैकी दोन-तीन पोथ्या या आम्ही पाहिल्या. महानुभव मंडळी एकमेकांना नमस्कार करताना काय म्हणतात ती दंडवतांची भाषा मी शामरावांकडून प्रथम ऐकली.

सुंदरराव डोंगरकेरी यांची ही भेट एका वेगळ्याच कारणासाठी माझ्या लक्षात राहिली. डोंगरकेरी एका वेगळ्या वातावरणात वाढलेले. न उकळलेला सौम्य आणि साखर अगदीच कमी असलेला चहा घेण्याची त्यांना सवय. मराठवाड्यात तेव्हा (आणि बहुतेक ठिकाणी आजही) खूप उकळलेला आणि खूप साखर घातलेला चहा लोकप्रिय असे. उकळू नका म्हटले तरी कोणी ऐकत नसे. काही वेळा हा अनुभव घेऊन डोंगरकेरी शहाणे झाले होते. चहाचा कप आणून कोणी दिल्यास ते एक कप गरम पाणी मागवून घेत आणि चहामध्ये ते पाणी ओतून तसा सौम्य झालेला चहा ते पीत. चहा देण्याची इच्छा असलेल्या लोकांना नाराज करायचे नाही म्हणून डोंगरकेरींनी हा मार्ग काढला होता.

माझ्याबरोबर महाविद्यालयात शिकणारी काही मित्रमंडळी पुढच्या शिक्षणासाठी औरंगाबादलाच होती. काही मित्र बी.ए. झाल्याबरोबर महसूल वगैरे खात्यात सरकारी नोकरीत शिरले होते. जवळच्या मित्रापैकी बीडला कोणीच नव्हते. औरंगाबाद शहरातले वातावरण बरीच हालचाल असलेले, उत्साहाचे होते. रज्यपुनर्रचनेनंतर अनेक बदल गावात आणि गावातल्या सार्वजनिक जीवनात बदल झाले होते. साहित्य परिषद, 'मराठवाडा' वृत्तपत्र यांच्या कचेऱ्या औरंगाबादला आल्या होत्या. परिषदेचे मुखपत्र असलेले 'प्रतिष्ठान' मासिक औरंगाबादहून निघू लागले होते. मला आकर्षित करणाऱ्या या गोष्टी होत्या. या नव्या संस्थ व त्यांचे चालक यांचा माझा परिचय होत होता. औरंगाबादच्या तुलनेत बीड एकदम शांत व सुस्त गाव वाटत होते. त्यामुळे मला थोडेसे एकटे आणि अस्वस्थ वाटत होते. त्यातच आमच्या भागात घडणाऱ्या राजकीय बदलाचे परिणाम घरातही जाणवू लागले होते. वडील स्वातंत्र्यचळवळीत असल्यामुळे कार्यकर्त्यांचा आणि मित्रांचा सारखा राबता वाड्यात असायचा. तेही सतत कामात असायचे. छपन्न साली झालेल्या राज्य पुनर्रचनेनंतर मराठवाड्यातले राजकारण झपाट्याने बदलले होते. मुंबई प्रांताच्या नेतृत्वाने मराठवाड्यात अनुयायी मिळविण्याचा प्रयत्न चालविला होता. या बदलणाऱ्या चित्रात स्वातंत्र्यचळवळीत सहभाग असलेल्या स्वामीजींच्या नेतृत्वाला

मानणाऱ्या कार्यकर्त्यांना बाजूला सारून नव्या लोकांना आणण्याचा प्रयत्न चालू होता. आजवर प्राधान्य नसलेला जात हा घटक राजकारणात आता प्रभावी ठरणार असे दिसू लागले होते. सहकारी चळवळ निजामी राजवटीतसुद्धा होती. त्यात काम करणाऱ्या काँग्रेसच्याच कार्यकर्त्यांना बाजूला सारून सरकारी नेमणुकीने नवे कार्यकर्ते निर्माण केले जाऊ लागले होते. मराठवाडा प्रदेश काँग्रेसच्या नेतृत्वातही बदल झाला होता. या सर्व पार्श्वभूमीवर माझ्या वडिलांनी (मी त्यांना काका म्हणत असे) काँग्रेसचा राजीनामा दिला. त्यांच्याबरोबर बीड जिल्ह्यातील अनेक जुन्या  कार्यकर्त्यांनी काँग्रेस सोडली. जवळजवळ वीस वर्षे ज्या संघटनेत काकांनी काम केले होते तिला सोडण्याचा निर्णय त्यांच्यासाठी वेदनादायक असणार. घरातले वातावरणही तेव्हा थोडे उदास वाटत होते. काकांनी पक्षीय राजकारणातून निवृत्त होऊन वकिलीवर लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले होते. वाड्यात राजकीय मंडळींची उठबस हळूहळू कमी झाली आणि फक्त पक्षकार आणि काकांचे स्नेही येऊ लागले.

आमच्या शाळेत विष्णुपंत पारगावकर हे उत्तम हस्ताक्षराचे गृहस्थ मुख्य कारकून म्हणून काम करीत. त्यांच्या हाताखाली मनोहर हा गावातील याज्ञिकी दासोबा मांडे यांचा मुलगा काम करी.  देवीदासराव ऊर्फ दासोबा मांडे हे ज्योतिषाचे जाणकार समजले जात. गावात पत्रिका तयार करणाऱ्या थोड्या लोकांपैकी ते एक होते. शिवाय त्यांना गाण्याचे अंगही होते. गावात हौशी मंडळींनी नाटक बसवले तर  गोरेपान दासोबा झिरमाळ्याची पुणेरी पगडी घालून  सूत्रधाराच्या भूमिकेत हमखास दिसायचे बीडमध्ये दर गुरुवारी दासोबांच्या घरी काही लोक जमतात आणि गुरुवार करतात असे मला ऐकून माहीत होते. एकदा मी मनोहरला मी गुरुवारला येऊ का असे विचारले, त्याने अवश्य या असे उत्तर दिल्यानंतर मी मांड्यांच्या घरी गेलो. कोतवाल गल्लीतील दासोबा मांड्यांच्या वाड्यात सात- आठ खणांच्या छोट्याशा जागेत दहा-बारा लोक बसलेले होते. एका कोपऱ्यात दत्ताची तसबीर स्टुलावर ठेवलेली होती व तिला हार घातलेला होता. थोड्याच वेळात पंचपदीला सुरुवात झाली. पंचपदी म्हणजे दत्ताच्या स्तुतीपर असलेली  पाच पदे म्हणावयाची. ती बहुधा श्रीपादशास्त्री जेरे यांनी रचलेली असावीत. 'तांबूल हा तुजला, दयाळा!' हे त्यातल्या एका पदाचे धृपद माझ्या लक्षात आहे. ही पंचपदी म्हणण्यात बहुधा सर्वच लोक भाग घेत होते.  पंचपदी झाल्यानंतर बैठकीत चहा आला. दासोबा मांडे आत उठून गेले आणि त्यांनी बैठकीत सतरंजीवर चहा घेण्याऐवजी ओसरीवर पाटावर बसून चहा घेतला. नंतर गाण्याला प्रारंभ झाला.

गुरुवार हा मराठवाड्याच्या सांस्कृतिक जीवनाचा एक भाग झाला होता. निजामी राजवटीत गुरुवार हा आणखी सोयीचा दिवस होता. शुक्रवारी त्या काळात सुटी असे. म्हणून गुरुवारी दत्ताच्या उपासनेत आणि करमणुकीसाठी थोडे जागरण झाले तरी चालत असे. प्लेगमुळे गाव बाहेर निघालेले असतानासुद्धा कॅम्पवर (तात्पुरत्या वस्त्यांवर) गुरुवार होत. सर्वच ठिकाणी पंचपदीनंतर गाणी होत नसत. कोठे पत्ते, सोंगट्या असे खेळ तर कोठे जादुचे प्रयोग नकला असेही काही होई. दुसरे काही अधिक चांगले व्यवधान नसल्यामुळे मांड्यांच्या घरी  गुरुवारला अधूनमधून जाऊ लागलो.

गुरुवार आणि पंचपदी हे निमित्त असले तरी मुख्य भाग पंचपदीनंतर गावातल्या गायकांची होणारी गाणी हाच असे. स्वत: दासोबा, किशोरसिंग बुंदेले, विष्णुपंत धुतेकर अशी मंडळी नेहमीच थोडेफार गात असत. दासोबांच्या मुला-मुलीपैकी बहुतेक गात असत. तेही क्वचित गात. याव्यतिरिक्त आवाजाची अनुकूलता नसली तरी गाण्याचा अट्टाहास

करणारी मंडळीही असत. त्यांनाही संधी मिळे. देवापुढच्या हजेरीप्रमाणेच गुरुवारातली हजेरी असे. पुढे काही वर्षांनंतर डॉ. उमेश पेंढरकर बीडला प्रॅक्टीसला आले आणि तेही गुरुवारला येऊ लागले. गाण्याची आवड आणि जाण असलेल्या या डॉक्टरांनी त्यानंतर बीडमध्ये म्युझिक सर्कल सुरू केले, शास्त्रीय संगीत समजून ऐकणारा वर्ग निर्माण केला व अनेक मोठ्या कलावंतांना त्यांच्यामुळे मला ऐकता आले.

मी बी.ए.च्या पुरवणी परीक्षेसाठी नेहमीच्या आठ दिवसांऐवजी चांगला महिना- दीड महिना अभ्यास करण्याचे मी आणि भगवानने ठरवले. बीडला महिनाभर अभ्यास झाल्यानंतर पंधरा दिवस औरंगाबादच्या रंगारगल्लीतील एक खोली भाड्याने घेऊन तेथे आम्ही अभ्यास केला. एकट्या इंग्रजीचेच दोन पेपर द्यावयाचे असल्यामुळे यावेळची परीक्षा फारशी कठीण जाणार नव्हती. पुरवणी परीक्षेत मी आणि भगवान दोघेही उत्तीर्ण झालो. मी पास झाल्याचा खरा आनंद माझ्या आजीला झाला. आजी म्हणजे माझ्या वडिलांची आई- तिला मी बाई म्हणत असे.

बी.ए. झाल्याच्या आनंदात एक गुरुवार आपल्या घरी करावा असे मला वाटले. कोणी निमंत्रण दिल्यास गुरुवार त्या माणसाच्या घरी होई; एरवी तो मांड्यांच्या घरी होतच असे. आमच्या घरी झालेल्या त्या गुरुवारचा विशेष म्हणजे त्या दिवशी पंचपदीनंतर फक्त सदाशिवराव बाब्रसांचे गाणे झाले. एक उत्तम शिंपी म्हणून बाब्रसांना मी काही काळ पाहिले होते. कोट शिवायचा असेल तर तो त्यांच्याकडून शिऊन घ्यावा असे गावात मानले जाई. सदाशिवरावांचा आवाज अतिशय गोड होता. शास्त्रीय संगीताची शिक्षण घेतलेले बाब्रस आकाशवाणीच्या औरंगाबाद केंद्रावर गात असत. ते बंद झाल्यावर मग पुणे केंद्रावर त्यांचे काही कार्यक्रम होत. या गुरुवारला बरेच गर्दी होती. त्या दिवशी बाईंच्या चेहऱ्यांवरचा आनंद लपत नव्हता. तिच्यासाठी हा गुरुवार म्हणजे नाना (मी) बी.ए. झाल्याचा आनंदोत्सव होता.

माझे वडील आणि माझे सख्खे चुलते एकत्रच राहत असत. १९४९ साली प्लेगच्या शेवटच्या फेऱ्यात माझी काकी गेली. त्यानंतर चुलत्यांनी पुन्हा लग्न केले नव्हते. बाईचा म्हणजे माझ्या आजीचा चुलत्यांनी पुन्हा लग्न करावे असा आग्रह चालू होता. चुलत्यांचे वय चाळीशी जवळ पोहोचलेले. तिशी-पस्तीशीची अविवाहित मुलगी सापडणे अवघड होते. पण एक स्थळ मिळाले आणि चुलत्यांनी पुन्हा लग्न केले. नव्या काकी गावातल्याच होत्या. आठ-दहा दिवस त्या वाड्यात राहिल्या; पण पुढे त्यांनी सारखे माहेरी जाणे व तिकडेच महिना-महिना राहणे सुरू केले. आजीला शंका आली की त्यांना वेगळे राहायचे असावे. त्यांनी माझ्या वडलांना सांगितले की 'तू जनार्दनला (चुलत्यांना) विचार की तिला वेगळे राहायचे आहे काय? आणि तिची तशी इच्छा असेल तर तुम्ही इथेच वेगवेगळे राहा. आजीला आलेली शंका खरी ठरली. मग चुलते वाड्यातल्या आमच्या मूळ भागात आणि आम्ही वडिलांनी नंतर विकत घेतलेल्या हिश्यात राहू लागलो.

चुलत्यांचे वेगळे राहणे काकींच्या हट्टामुळे असले तरी ते कोणालाच आवडण्यासारखे नव्हते. माझे वडील आणि चुलते यांच्यात फक्त दोन-अडीच वर्षांचे अंतर होते; पण वडिलांकडे पालकाची भूमिका आली होती. वडिलांचे सार्वजनिक काम आणि त्यांचे चळवळीमुळे घडणारे तुरुंगवास यामुळे आमच्या वाट्याला ते फार कमी येत. चुलते तहसीलमध्ये नोकरी करीत व ते आम्हा मुलांना वेळ देऊ शकत. चुलत्यांचे गणित चांगले. त्यांनीच मला गणित आणि उच्च गणित हे दोन्ही विषय महिनाभर शिकवले व निदान काठावर तरी पास होण्याची

माझी तयारी करून घेतली. लहानपणी ते आम्हा सगळ्याच मुलांना शहराजवळ असलेल्या रणखांबासारखी ठिकाणी दाखवत, कधी पोहयाला शिकवीत. उन्हाळ्यात रात्री गच्चीवर झोपायला गेले म्हणजे आकाशातल्या नक्षत्रांची ओळख करून देत. मामाकडे आई आम्हाला घेऊन जाणार असली म्हणजे तेच सोबत येत. हैदराबाद स्वातंत्र्यलढ्याच्या शेवटच्या टप्प्यात निजामाच्या नोकऱ्या सोडण्याचे आवाहन करण्यात आले होते; तेव्हा त्यांनी आपली नोकरी सोडून दिली होती. प्लेगने गेलेली आमची काकी सगळ्याच मुलांना लळा लावणारी होती. तिचा चेहरा मला अस्पष्ट आठवतो. चुलते वेगळे राहू लागले यात काही गैर नव्हते. आजीला वेगळीच काळजी होती. पहिल्या काकींची मुले आता सावत्र आई सांभाळणार होती. माझी आजी आणि आई दोघींचाही जीव त्या मुलांत स्वाभाविकपणेच गुंतलेला होता.

खरे म्हणजे आई-बापांचा किंवा आजोबा-आजींचा जीव आपल्या सगळ्याच मुला-नातवंडांत सारखाच असतो. पण का कुणास ठाऊक आजीची माया माझ्या वाट्याला थोडी जास्त आली होती. पहिले नातवंड असल्यामुळे असेल, किंवा वडील माझ्या लहानपणात बराच काळ तुरुंगात आणि चळवळीत असल्यामुळे असेल, पण बाईंचा- माझ्या आजीचा- माझ्यावर विशेष लोभ असे. कित्येकवेळा त्यात थोडा अतिरेकही होई. अंगणात बांधलेल्या चुलत चुलत्याच्या गायीने मला एकदा ढुसणी दिली. मी पडलो पण मला फारसे लागले नव्हते.  पण आजीने घरात जाऊन काठी आणून गायीला एक तडाखा दिला.

माझे आजोबा वडिलांच्या लहानपणीच गेले होते. त्यांच्या माघारी आजीने घर सांभाळले होते. आयुष्याचा बराच काळ  भोगलेल्या वैधव्यात आजीला दम्याने सोबत केली होती. तिची पाठ दुखे. ती पाठ चेपून देण्याचे काम कधी कधी ती मला सांगायची. एरवी आपले कोणतेही काम दुसऱ्याला सांगायची तिची रीत नसे. डिसेंबर १९५७ मध्ये आजी आजारी पडली. तीन-चार दिवस तिला चांगलाच ताप होता. त्यातही ती आपले काही दुसऱ्याने करू नये असा आग्रह धरायची. गावातले एक मिश्रवैद्यक शिकलेले पण ॲलोपॅथीचीच प्रॅक्टीस करणारे डॉक्टर चांगल्या परिचयाचे होते. त्यांना मी आजीला पाहण्यास व औषध देण्यास सांगितले. एकदाच ते पाहून गेले व त्यानंतर त्यांनी आजीला देण्यासाठी दोन-तीन पुड्या दिल्या. आजीचा आजार हा विषमज्वर आहे असे त्यांचे निदान होते. पण क्लोरोमायसेटिनच्या कॅप्सूल लिहून देण्याऐवजी त्या कॅप्सूल्स फोडून त्यातील पावडर पुड्यात दिली होती. असे त्यांनी का केले हे माहीत नाही. पण ती पावडर भयानक कडू असल्यामुळे एकच पुडी घेतल्यानंतर आजीने पुन्हा औषध घेण्यासच नकार दिला.

आयुष्यभर उपसलेले कष्ट आणि दम्याशी दिलेली झुंज यामुळे जर्जर झालेले तिचे शरीर थकलेले होते. आजार तिला सहन झाला नाही आणि दोन -तीन दिवसांनीच तिचा अंत झाला. योगायोगाची गोष्ट अशी की मी आणि माझे वडील दोघेही वेगवेगळ्या कारणासाठी सुमारे पंधरा- वीस मिनिटे बाहेर गेलो होतो तेवढ्या वेळातच आजींनी जगाचा निरोप घेतला होता. माझे चुलते तिच्याजवळ होते. मी तिच्याजवळ नेमक्या त्या क्षणी नव्हतो याची बोच मला बरेच दिवस विसरता आली नाही.

वडिलांची प्रॅक्टीस चांगली होतीच; शिवाय निष्णात दिवाणी वकील म्हणून त्यांचा लौकिक होता. मी वकिली करावी अशीच त्यांची मनातून इच्छा असणार. पण त्यांनी ती कधी माझ्यावर लादणे तर सोडाच; स्पष्टपणे बोलूनही दाखवली नाही. त्यांच्या सचोटीबद्दल आणि ज्ञानाबद्दल इतरांच्या मनात दिसत असलेल्या आदराने मला वकील होण्याची प्रेरणा दिली

होतीच. परंतु अद्याप मन निर्णय करीत नव्हते. दुसराही एक पर्याय मनात होता. तो म्हणजे मराठीचा प्राध्यापक व्हावे. मराठी वाङ्मयाची आवड तर होतीच; लेखक होण्याचीही इच्छा मनात डोकावत होती. वक्तृत्व तर परंपरेनेच आले होते. सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणून

प्राध्यापकीची आवड निर्माण झाली असावी.

शिक्षकीचे वर्ष संपायला तीन- चार महिने उरले होते. कामाचा थोडाफार कंटाळाही आला होता. या काळात प्राध्यापक व्हावे की वकील या प्रश्नाचा विचार करता करताच वेळ जात होता. शेवटी दोन्हीचीही तयारी करावी, एम.ए. आणि एलएल. बी. दोन्ही पदव्या मिळवाव्यात असे ठरवले. एप्रिलच्या शेवटी नोकरीचा राजीनामा मुख्याध्यपकांना सुपूर्द केला आणि मी औरंगाबादला जाण्याची तयारी सुरू केली.

न्या. नरेन्द्र चपळगावकर,
१३ जयनगर, दशमेशनगरजवळ,
औरंगाबाद - ४३१ ००५
दूरध्वनी ०२४०- २३३११६६

शब्दसंख्या : ३८६२